
REGISTERED No. P. 3434



# अर्थ

" अर्थ एव प्रधानः " इति कौटिल्यः अर्थमूलौ धर्मकामाविति । —कौटिलीय अर्थशास्त्र

वर्ष १३ पुणें, बुधवार तारीख २८ मे १९४७ अंक २२



## सारस्वत
### को–ऑपरेटिव्ह बँक लिमिटेड

[स्थापना १९१८]सारस्वत बँक बिल्डिंग, गिरगांव, मुंबई
टे. नं. ३१६७५ ३१–१–१९४७

| | | |
|---|---|---|
| आधिकृत भांडवल | ... | रु. ५,००,००० |
| विक्रीस काढलेलें भांडवल | | रु. ४,००,००० |
| वसूल झालेलें भांडवल | ... | रु. ३,९६,००० |
| रिझर्व्ह व इतर फंड्स् | ... | रु. ९,०४,००० |
| ठेवी | ... | रु. ६८,५९,००० |
| एकूण खेळतें भांडवल | ... | रु. ७५,००,००० |

स्पेशल सेव्हिंग्ज डिपॉझिट स्कीम
व्याज : २ टक्के
बँकेचे सर्व व्यवहार केले जातात.
—विशेष माहितीसाठी लिहा अगर भेटा

व्ही. पी. वर्दे, बी. कॉम्. चेअरमन | एस. व्ही. संझगिरी, बी. कॉम्. सेक्रेटरी

सब–ऑफिस : दादर, ( बी. बी. रेल्वे स्टेशनसमोर )

मुंबई इलाख्यांतील सहकारी चळवळीच्या केंद्रस्थानीं असलेली

## शेतकऱ्यांची प्रांतिक बँक
म्हणजेच
## बॉम्बे प्रॉव्हिन्शियल को–ऑपरेटिव्ह बँक लिमिटेड

( सहकारी कायद्यान्वयें नोंदलेली )
स्थापना १९११

—मुख्य कचेरी—
सर विठ्ठलदास ठाकरसी मेमोरियल बिल्डिंग
९, बेक हाऊस लेन, कोट, मुंबई.

शाखा ५०

**खेळतें भांडवल रु. ७,३१,००,०००**

या बँकेंत मुदतीच्या, चालू व सेव्हिंग बँक ठेवी स्वीकारल्या जातात
आणि
इलाख्यांतील बहुतेक सर्व प्रमुख ठिकाणीं हुंडीचा व्यवहार केला जातो.

—पूर्ण माहितीकरितां हेड ऑफिसकडे लिहा—
व्ही. पी. वर्दे
ऑ. मॅनेजिंग डायरेक्टर.

## आरको
प्रत्येकास लागणारी नित्योपयोगी वस्तू
आरको निलगिरी तेल
लक्ष्मी एजन्सी, मुंबई २४

तयार कपड्यांचे व्यापारी **माहिंद्रकर ब्रदर्स** गिरगांव, मुंबई नं. ४ व बुधवार चौक, पुणें

—सर्व प्रांतांतील—
सुती – गरम – रेशमी
—खादीचें माहेरघर—

## खादी मन्दिर

२६२, बुधवार पेठ, ढमढेरे बोळाजवळ, पुणें २

## विविध माहिती

**मद्रास प्रांतांत तांदुळाच्या शिध्यांत कपात**—देशांतील अन्न विषयक परिस्थिति लक्षांत घेऊन मद्रास प्रांतांतील तांदुळाच्या शिध्याचें प्रमाण दर दिवशीं दर माणशीं १२ औंसाऐवजीं १० औंस करण्यांत येणार आहे असें समजतें.

**आंतरराष्ट्रीय व्यापार परिषदेची अगतिकता !**—जिनीव्हा येथें चालू असलेल्या आंतरराष्ट्रीय व्यापार परिषदेसंबंधी सोव्हिएट अर्थशास्त्रज्ञ मि. व्हार्गा यांनीं असें लिहिलें आहे कीं औद्योगिक दृष्ट्या मागासलेलीं राष्ट्रें आपसांतील मतभेद मिटवूं शकतील, परंतु जीं राष्ट्रें अमेरिकेच्या मागण्या मान्य करणार नाहींत त्यांच्याशीं पतीवर व्यवहार करण्यांत येणार नाहीं या अमेरिकेच्या धमकीमुळें त्या राष्ट्रांत तडजोड होऊं शकत नाहीं.

**रशिआनें 'जेट'चें विमान बनविलें**—जर्मन तज्ज्ञांच्या मदतीनें रशिअन विमान कारखान्यांतून 'जेट'चीं विमानें तयार करण्यांत येऊं लागल्याची बातमी आहे. या विमानांची गति ताशीं ५०० मैलांहून अधिक रहाणार असून, त्यांचा उपयोग लढाऊ विमानें म्हणून करण्यांत येईल असें समजतें.

**मद्रास प्रांतांतील पाणी-पुरवठा**— मध्यवर्ती सरकारच्या अन्नधान्याच्या निर्मितींत वाढ करण्याच्या धोरणास अनुसरून मद्रास सरकारनें २०० लहान धरणें बांधण्याची योजना आखली आहे. हीं धरणें ५ वर्षांत बांधण्यांत येणार असून त्यांना खर्च ५ कोटी रुपये येणार आहे. धरणें बांधून झाल्यावर २½ लाख नवीन जमीन भिजूं शकेल.

**आळशीचें तेल द्या, नाहीं तर गहूं बंद**—जागतिक अन्न समितीनें मंजूर केलेलें आळशीचें तेल हिंदुस्थानांतून ऑस्ट्रेलिआला मिळालें नाहीं तर ऑस्ट्रेलियान गहूं निर्यात करण्याचें बंद करण्याची धमकी हिंदुस्थान सरकारला दिली असल्याचें समजतें. हिंदुस्थान सरकार व्यापाऱ्यांना निर्यातीचे परवाने देतें; परंतु हे व्यापारी निर्यातीकडे दुर्लक्ष करतात; म्हणून सरकारनेंच आळशीच्या तेलाच्या निर्यातीची जबाबदारी घ्यावी असें ऑस्ट्रेलिअन सरकारचें म्हणणें आहे.

**हिंदुस्थानचा पूर्व आफ्रिकेशीं व्यापार**—पूर्व आफ्रिकेंतील हिंदी ट्रेड कमिशनरनें हिंदुस्थान सरकारला पाठविलेल्या अहवालांत, पूर्व आफ्रिकेंतील हिंदी व्यापार बसत चालला असल्याचा इषारा दिला आहे. युद्धकालांत हा व्यापार भरभराटीचा होता; पण आतां स्पर्धेमुळें त्याला पुन्हां ओहटी लागली आहे असें समजतें.

**झेकोस्लोव्हाकिआंत 'फेझ' टोप्यांचा कारखाना**—मध्य-पूर्वेतील मुसलमानांसाठी तांबड्या 'फेझ' टोप्यांचा कारखाना झेकोस्लोव्हाकिआंत सुरू करण्यांत आला आहे. ह्या टोप्यांचें उत्पादन झपाट्यानें वाढविण्यांत येत आहे.

**संयुक्त-राष्ट्रसंघटनेंत येण्यासाठीं इटलीचा अर्ज**—वॉशिंग्टन येथील इटलीच्या वकिलानें, संयुक्त-राष्ट्रसंघटनेंत इटलीला प्रवेश मिळावा म्हणून संघटनेच्या चिटणिसांना अर्ज सादर केला. या संघटनेचीं सर्व तत्त्वें व जबाबदाऱ्या इटलीला मान्य असून जागतिक शांतता टिकविण्यासाठी या संघटनेचा चांगला उपयोग होईल असें आपलें मत इटालिअन वकिलानें या प्रसंगीं बोलून दाखविलें.

**त्रावणकोर संस्थानचें सहकार्य**—त्रावणकोर संस्थानांतील अभ्रक आणि इतर खनिज संपत्ती यासंबंधीं संशोधन करण्याची व्यवस्था त्रावणकोर संस्थाननें हिंदुस्थान सरकारच्या सहकार्यानें केली आहे. संस्थाननें अणुशक्तीच्या उत्पादनाबाबत कांहीं ब्रिटिश कंपन्यांशीं करार केल्याचें प्रसिद्ध आहे.

**हिंदुस्थानांत 'झेक' बोलपट येणार**—कलकत्ता, मुंबई-सारख्या मोठ्या शहरीं 'झेक' बोलपट दाखविण्याची व्यवस्था करण्याच्या इरादानें बोलणीं करण्यासाठीं एक झेक बोलपट मंडळ हिंदुस्थानला येण्यास निघालें आहे.

**खाजगी मालकीचे पौंड परत मिळणार**:—हिंदुस्थानांतील व्यापारी वर्गाचे इंग्लंडच्या बँकेंत युद्धकालांत सांठलेले पौंड सूट देण्याच्या कक्षेबाहेर आहेत असें समजतें. हिंदुस्थान सरकारच्या पौंडांतील देण्याच्या मानानें खाजगी व्यापाऱ्यांचे पौंड इतके अल्प आहेत कीं तेवढे परत दिल्यानें इंग्लंडचें नुकसान अगदींच किरकोळ होईल असें म्हणतात; आणि म्हणूनच हे पौंड परत मिळण्याची अपेक्षा आहे.

**अमेरिकन साबण आणि स्टेरिक ॲसिड** — अमेरिकेच्या शेतकी खात्यानें हिंदुस्थानसाठी २,८२५ पौंड अंगाला लावण्याचा साबू आणि २५ हजार पौंड स्टेरिक ॲसिड मंजूर केलें आहे.

**अमेरिकेनें दिलेल्या कर्जाचा हिशोब**—१९४७ च्या पहिल्या तीन महिन्यांत अमेरिकेनें ब्रिटनला दिलेल्या कर्जापैकी ब्रिटननें ५० कोटी डॉलर्स काढले असें ब्रिटिश अर्थमंत्र्यांनीं पार्लमेंटमध्यें सांगितलें. यापैकी ७ कोटी डॉलर्स ब्रिटिश व्याप्त जर्मनीला अन्न-वस्त्रादि आवश्यक जिनसा पुरविण्यासाठी खर्च झाले असावे असा अंदाजही त्यांनीं व्यक्त केला.

**भातकल बंदरासंबंधीं परिषद**—जूनच्या १० तारखेला भातकल बंदराशीं संबंध असलेल्या सरकारांच्या प्रतिनिधींची परिषद मुंबई येथें भरणार आहे. मध्यवर्ती सरकारतर्फे वहातूक मंत्री मि. जॉन मथाई आणि म्हैसूर सरकारतर्फे सर रामस्वामी मुदलिआर हजर रहाणार आहेत.

**ब्रिटन अधिक कर्ज मागत नाहीं.**—ब्रिटिश फडणिशी खात्यांतील एका अधिकाऱ्यानें, ब्रिटन अमेरिकेकडे आणखी कर्ज मागण्याचा विचार करीत असल्याच्या बातमीचा इन्कार केला आहे.


शाळाखात्याची मान्यता मिळालेलें

**पूना कमर्शिअल हायस्कूल**

एस. एल. सी. परीक्षेचा कोर्स, जमाखर्च, टाईपरायटिंग, शॉर्टहँड इत्यादि विषय. इंग्रजी ३ री व ४ थी पास झालेल्या विद्यार्थ्यास अनुक्रमें ४ थी व ५ वीमध्यें प्रवेश. होतकरू व गरीब विद्यार्थ्यांसाठी शिष्यवृत्त्या आहेत. वर्ग जूनपासून सुरू.

मुख्याध्यापक

पत्ताः—२५७ क, बुधवार पेठ, फरासखान्याच्या हौदासमोर, पुणें २

**दि मोटार ओनर्स म्युच्युअल इन्शुअरन्स कं. लि. (बेळगांव)**

पुणें शाखाः—९७४ सदाशिव, लक्ष्मीरोड.

मोटार मालकांनींच स्थापन केलेली, मोटारीचा विमा उतरणारी, मोटार मालकांचेंच संचालक मंडळ असलेली व विमेदारांना हक्कानें शेअर्स देणारी अखिल भारतांतील पहिलीच संस्था. प्रीमियमचे दर अत्यंत माफक व शिवाय अनेक सवलती. —एजन्सी व इतर माहितीकरितां चौकशी करा.—

ब्रँच सेक्रेटरी

# अर्थ

बुधवार, ता. २८ मे, १९४७



प्रा. वा. गो. काळे

संपादक : श्रीपाद वामन काळे

वा. वर्गणी ट. ख. सह ६ रु. किरकोळ अं. २ आणे.


## हिंदुस्थानाची अन्न परिस्थिति

### आयातीवर सर्व कांहीं अवलंबून ?

हिंदुस्थानाच्या अन्नपरिस्थितीचा असमाधानकारकपणा कायम आहे, इतकेच नव्हें तर येते कांहीं महिने काळजीचे जाणार आहेत. गव्हाच्या पिकावर रोग पडल्याकारणानें, अपेक्षेपेक्षां लक्षावधि टनांनीं उत्पादन घटलें आहे. त्याचबरोबर, प्रांतिक सरकारांची व संस्थानांची धान्याच्या लेव्हीची मोहीम थोडी ढिली पडली आहे. अशा रीतीनें, सुमारें ४५,००,००० टन धान्याची तूट पडत आहे. धान्याची वसुली व आयात ह्या मार्गांनीं शक्यतोंवर ती भरून काढण्याचा प्रयत्न करावा लागेल. तांदूळ, गहूं व इतर धान्यें ह्यांच्या हिंदी उत्पादनाचे तुलनात्मक आंकडे अन्न मंत्री डॉ. राजेंद्र प्रसाद, ह्यांनीं नुकतेच सांगितले ते खालीलप्रमाणें आहेत:—

( आंकडे हजार टनांचे आहेत. )

| | १९४५–४६ अखेर ५ वर्षांची सरासरी | १९४५–४६ | १९४६–४७ |
|---|---|---|---|
| तांदूळ | २७,०९३ | २६,३५४ | २७,२८० |
| गहूं | १०,०५४ | ८,९०० | ८,००० |
| इतर | ९,४८३ | ८,९४० | ८,९०० |

म्हणजे, तांदळाच्या बाबतींत परिस्थिति थोडी सुधारली, तरी गव्हाचें उत्पादन पूर्वीच्या पांच वर्षांच्या सरासरीचे मानानें २० लक्ष टनांनीं उतरलें आहे. इतर धान्यांचें उत्पादनहि ९ लक्ष टनांनीं घसरलें आहे. अशा रीतीनें, सुमारें ३० लक्ष टनांच्या तुटीचा हिशेब होतो. ब्रह्मदेशांतून होणाऱ्या १५ लक्ष टन तांदळाच्या सरासरी आयातीचा समावेश ह्यांत होत नाहीं.

हिंदुस्थानानें इंटर नॅशनल इमर्जन्सी फूड कौन्सिलकडे चालू वर्षासाठी १५ लक्ष टन तांदळाची मागणी केली, परंतु कौन्सिलनें हिंदुस्थानास फक्त ४,८५,००० टन देऊं केले आहेत. पहिल्या सहामाहीसाठी देऊं केलेल्या ४,१०,००० टनांचा वरील आकड्यांतच समावेश होतो. म्हणजे, १९४७ च्या दुसऱ्या सहामाहीसाठी हिंदुस्थानास फक्त ७५,००० टन तांदूळ मिळणार आहेत. हिंदी मागणीच्या मानानें हा पुरवठा अत्यंत अपुरा पडणार आहे, हें उघड आहे. गहूं व इतर धान्यें ह्यांचीहि मागणी हिंदुस्थान सरकारनें इं. इ. फूड कौन्सिलकडे केली आहे. परंतु त्याबाबत कौन्सिलचा निर्णय अद्याप बाहेर आलेला नाहीं. हिंदुस्थानांतील गव्हाचें पीक खराब झाल्याकारणानें त्या धान्याची पडलेली तूट बाहेरून येणाऱ्या धान्यानें कितपत भरून येते, हा महत्त्वाचा प्रश्न आहे. जुलै ते नोव्हेंबर ह्या मुदतींत, पूर्वीं पिकलेलें धान्य व आयात होणारें धान्य ह्यावरच हिंदी जनतेस दिवस काढावे लागतील; नवें पीक तोपर्यंत हातीं येणार नाहीं. हा काळ काळजीचा व बिकट असा गेला तरी जनतेस विशेष उपासमारीची पाळी येणार नाहीं, अशी आशा डॉ. राजेंद्र प्रसाद ह्यांनीं व्यक्त केली आहे. शेतीप्रधान हिंदुस्थानास युद्ध-समाप्तीनंतरहि रोजच्या रेशनचें अल्पसें प्रमाण टिकविण्यासाठी परदेशांकडे दीनवाणीनें पहावें लागत आहे, ही अत्यंत नामुष्कीची गोष्ट आहे. अन्नधान्यांचें उत्पादन वाढविण्याच्या प्रयत्नांचें फळ हातीं येण्यास कांहीं वर्षे तरी लागणार; तेव्हां तातडीची गरज भागविण्यासाठीं आयातीवर विसंबून बसणें क्रमप्राप्तच होत आहे.

तांदळाच्या पिकाचा अभ्यास करण्यासाठीं नेमण्यांत आलेल्या संयुक्त राष्ट्रांच्या अन्न–शेती संघटनेच्या ' राइस स्टडी ग्रुप ' च्या त्रिवेंद्रम येथील बैठकीचा उल्लेख येथें करणें युक्त होईल. पूर्व आणि दक्षिण आशियामधील देशांतील तांदळाच्या प्रश्नाचा सपशीलवार अभ्यास करून , तेथील तांदळाचें उत्पादन कसें सुधारेल ह्यासंबंधीं त्या 'ग्रुप' मधील तज्ञांनीं शिफारसी करावयाच्या आहेत. हे तज्ञ त्या देशांना प्रत्यक्ष भेटी देऊन माहिती गोळा करतील व अन्न–शेती संघटनेस ती सादर करतील. त्याचप्रमाणें आंतरराष्ट्रीय तांदूळ परिषदेंतहि त्यांच्या रिपोर्टांची चर्चा होईल. पूर्व आणि दक्षिण आशियांतील देशांत तांदळाच्या जागतिक उत्पादनाच्या ९०% उत्पादन होतें व खपतें. आतां तांदळाचा जागतिक तुटवडा पडला असल्याकारणानें आणि त्याच वेळीं गहूंहि अपुरा असल्यामुळें तांदूळ करणाऱ्या व खाणाऱ्या देशांना बाहेरून तांदूळ किंवा गहू मिळवून देणें अवघड होऊन बसलें आहे. हें जरी खरें असलें तरी आशियांतील तांदुळाचें उत्पादन सत्वर सुधारणें कठीण आहे ही गोष्ट विचारांत घेऊनच धान्याच्या जागतिक पुरवठ्याची जागतिक वाटणी केली जाणें युक्त ठरेल.

## मुंबई प्रांतांतील ग्रामोद्योग

मुंबई प्रांतातील ग्रामोद्योग केंद्रांतून तयार झालेल्या वस्तू विकण्याची सोय करण्यासाठीं मुंबई सरकारनें आपल्या सहकारी खात्यातर्फे मुंबई, नाशिक, सोलापूर, बेळगांव व सुरत अशा पांच ठिकाणीं विक्रीची केंद्रें उभारलीं आहेत. नाडिआड आणि विजापूर या ठिकाणींही आणखी दोन केंद्रें उघडण्यांत यावयाचीं आहेत असें समजतें. चालू केंद्रांतर्फे १९४५–४६ सालीं ९ लाखांवर किंमतीच्या मालाची उलाढाल झाल्याचें सरकारी अहवालांत नमूद करण्यांत आलें आहे. ग्रामोद्योग यशस्वी होण्यास जरूर असणारें शिक्षण, आधुनिक हत्यारें, प्रारंभी लागणारा पैसा वगैरे बाबींसंबंधीं होणारी सरकारी मदत महत्वाची असली तरी तयार झालेल्या मालाच्या विक्रीची व्यवस्था ग्रामोद्योगांच्या भरभराटीच्या दृष्टीनें अधिक महत्त्वाची आहे. गेल्या तीन वर्षांतील उलाढालीचे पुढील आंकडे पहाता विक्री–केंद्रें यशस्वी झालीं आहेत असें दिसून येईल.

उलाढाल (किंमत रुपये)

| केंद्र | वर्ष १९४३–४४ | वर्ष १९४४–४५ | वर्ष १९४५–४६ |
|---|---|---|---|
| मुंबई | १,७६,४४९ | २,१७,४६३ | ३,५७,३४८ |
| सुरत | ३८,०९५ | ८५,२६४ | १,५१,३५७ |
| नाशिक | ९४,००२ | १,११,४९८ | ३,३३,१८५ |
| बेळगांव | ५९,१४१ | ३५,१८४ | ७०,९१९ |

## कंपनी कायद्यांत दुरुस्ती

### श्री. ग. रा. साठे ह्यांचा अभिप्राय

( "अर्था" च्या ता. ७ मेच्या अंकांत, कंपनी कायद्यांतील नियोजित दुरुस्त्यांची माहिती दिली होती. सुप्रसिद्ध बिस्किट कारखानदार व प्रेसिडेन्सी इं. बँक लि. चे चेअरमन श्री. ग. रा. साठे, ह्यांचें प्रस्तुत दुरुस्त्यांवर मत मागितलें असतां त्यांनीं आपले विचार खालीलप्रमाणें व्यक्त केले. )

**( १ ) मेमोरँडम व आर्टिकल्स :**

प्रत्येक शेअर अर्जांत कंपनीचे नियमांस ( आर्टिकल्स् ) मान्यता द्यावी लागते. नियम वाचण्यास कंपनीचे ऑफिसांत सध्यां कोणीही जात नाहीं. सध्यां ९९ च नव्हे तर बहुधां १०० टक्के शेअर्सना अर्जदार नियमांची प्रत न पहातांच मान्यता देतात. तेव्हां नवीन नियम त्या दृष्टीनें अिष्टच आहे. तथापि त्यामुळें अमर्याद मागणी आल्यास काय करावयाचें हा खरोखरच विचार करण्यासारखा प्रश्न आहे. त्यास पुढील पर्याय सुचविण्यासारखा आहे. ज्याप्रमाणें शेअरबरोबर प्रास्पेक्टस् देण्याचें बंधन आहे, त्याप्रमाणें शिड्यूल "ए" मध्यें नसलेले वा शिड्यल "ए" मधील नियमांचे बदली असलेले तेवढेच नियम असलेलें पत्रक देण्याचें बंधन १४ दिवसांचे ऐवजी दोन महिन्यांची मुदत ठेवल्यास नियमाचा उद्देश साध्य होऊन कंपनीसही जाचक होणार नाहीं.

**( २ ) जोड नांवांची सूचना गैरवाजवी दिसत नाहीं.**

**( ३ ) शेअर वर्ग करण्याबाबतचें कलम :**

माहिती कंपनीच्या दप्तरीं ठेवण्यापुरती अगर कंपनीच्या दप्तरींच भागिदारांस उपलब्ध असण्यापुरतीच मर्यादा असल्यास त्यास हरकत दिसत नाहीं. धोरण ठरविण्याच्या वा मंजूर-नामंजूर करण्याच्या बोर्डाच्या अंतिम अधिकारास मात्र बाध येऊं नये.

**( ४ ) गुंतवणूक :**

डायरेक्टर्स हे भागीदारांनी निवडून दिलेले प्रतिनिधी असल्यामुळें कंपनीच्या हिताच्या दृष्टीनें पैशाचा योग्य तो वापर करण्यास बोर्डास पूर्ण अधिकार असावयास पाहिजे. त्यास साधारण सभेच्या मंजुरीची अट अव्यवहार्य ठरेल. शेअर्स व डिबेंचर्स गुंतवणुकीची यादी भागीदारांनी मागितल्यास त्यांस माहितीकरतां देण्यास हरकत नसावी. सदर माहितीवरून डायरेक्टर्स कंपनीचे हिताविरुद्ध वागत आहेत असें भागीदारांस वाटल्यास नवीन निवडणुकीचे वेळीं आपला मत देण्याचा अधिकार भागीदार वापरूं शकतोच. संमतीचें बंधन मात्र निश्चित नसावें.

( ५ ) रिडीमेबल शेअरबाबतचे नवीन नियमांस हरकत दिसत नाहीं.

( ६ ) डायरेक्टर रिपोर्टाबाबतचें नवीन नियमास विरोधच केला पाहिजे. सदर नियम कोठल्याही कंपनीस हितावह होणार नाहीं, एवढेंच नव्हे तर त्यामुळें फायद्यापेक्षा तोटेच अधिक होतील.

( ७ ) ऑडिटरचें सर्टिफिकेट नोंदण्यास हरकत नसावी, पण रिपोर्ट नोंदण्याचें बंधन नसावें. पुष्कळ वेळां रिपोर्ट हा कामाबाबत सूचना देणारा असतो. डायरेक्टर्सनीं सूचनांकडे दुर्लक्ष केल्यास ऑडिटरला भागीदारांचे सभेत खुलासा करतां येतोच.

( ८ ) ऑडिटरनें सभेस हजर राहिलेंच पाहिजे हें बंधन जाचक होईल. सध्यां ऑडिटर्सची संख्या नियंत्रित असल्यामुळें व एकाच ऑडिटर फर्मकडे अनेक कंपन्यांचीं कामें असल्यामुळें सर्व कंपन्यांचे सभांस ऑडिटरला हजर राहणें शक्य होईलच असें नाहीं. वाहतुकीची अडचण, आजारीपण, याही अडचणींचा विचार केल्यास ऑडिटरची उपस्थिति कायद्यानें बंधनकारक केल्यास वरचेवर सभा-तहकुबीचा प्रसंग येण्याचा संभव आहे. तेव्हां या नवीन नियमांस विरोध करणेंच जरूर आहे.

## ब्रिटनच्या कर्जफेडीचे विशेष परिणाम

( लेखकः—श्री. व. वि. लोणकर, एम्. ए. बी. कॉम )

हिंदुस्थानच्या ब्रिटनमधील स्टर्लिंग शिलकामध्यें कपात करण्याचें ब्रि. सरकारचें धोरण जाहीर झालेलेंच आहे. त्याच्या परिणामांची चर्चा पुष्कळच झालेली आहे. या ठिकाणीं आणखी कांहीं तात्कालिक परिणामांचा निर्देश करणें जरूर वाटतें. स्टर्लिंग शिलकांची ब्रिटननें परतफेड करीत रहाणें याचा अर्थ असा कीं, आमच्या देशाच्या आयात व्यापारांत बरीच वाढ होणें. मग तो माल खुद्द ब्रिटनमध्यें तयार झालेला असो अथवा ब्रिटनतर्फे इतर कोठल्याहि देशांतून आलेला असो. पूर्वीपासूनच आपल्या आयात-निर्यात व्यापारांत ब्रिटनला पहिलें स्थान आहे. स्टर्लिंग शिलकांच्या परतफेडीमुळें आयात व्यापाराचा पूर्वीपेक्षांही बराच मोठा हिस्सा ब्रिटन उचलीत रहाणार आहे. म्हणजे ब्रिटनला जो माल पुरविणें शक्य आहे, तोच माल आमच्या देशाला घेणें प्राप्त आहे. यामुळें पुष्कळदां अनुभव असा येईल कीं, एकादा जिन्नस इतर देशांकडे स्वस्त आणि जास्ती चांगला मिळत असला तरी आम्हांला तो ब्रिटनकडून घ्यावा पडेल त्या भावांत घेणें प्राप्त होईल आणि हिंदुस्थानच्या व्यापाराला अनिष्ट वळण लागेल. दुसरें असें कीं, पूर्वीचें 'इंपीरियल प्रेफरन्स' चें तत्त्व जरी आतां कागदोपत्रीं राहिलें नसलें तरी प्रत्यक्षांत ते परिस्थितीनें हिंदुस्थानला आचरणें भाग पडेल. याचा परिणाम, इतर देश पुष्कळसे रुसण्याकडे होऊन नव्या हिंदुस्थानला इतर राष्ट्रांशीं स्नेहयुक्त व्यापारी संबंध जडविणें तितकें सोपें जाणार नाहीं.

आमच्या चालूं मोठाल्या उद्योगधंद्यावरती होणारा एक विशेष परिणाम या ठिकाणीं नजरेस आणणें सयुक्तिक वाटते. ब्रिटननें कर्जामध्यें बरीच कपात एकदम केली आणि राहिलेलें कर्ज फेडण्याला अनेक वर्षांचा कालावधी घेतला तर वर सांगितलेल्या वाढत्या आयातीमुळें आमच्या उद्योगधंद्यांशीं संभाव्य होणारी चढाओढ बरीचशी कमी होईल. एक प्रकारें येथील कारखानदारीला अप्रत्यक्ष उत्तेजन मिळत राहील. आहेत त्याच कारखानदारीला हिंदुस्थानच्या वाढत्या गरजा स्वतःच्या मर्यादेत उत्पन्नांतून पुरविणें भाग पडेल. यांयोगें कारखानदारांचे नफेहि टिकून राहण्याकडे प्रवृत्ति होईल. मात्र इकडे जनतेला चढ्या किंमती द्याव्या लागतील. गुंतवणूक करणारांनीं स्टर्लिंग कर्ज कपातीचा हा तत्कालिन संभाव्य परिणाम लक्षांत घेणें जरूर आहे. याबरोबर हें मात्र लक्षांत घेतलें पाहिजे कीं, ही कारखानदारीची भरभराट फार काळ टिकणारी नाहीं. आमच्या पूर्वकालीन कारखानदारीची वाढ होण्याला कर्ज-परतफेडीमुळें जो वाव मिळाला असता तो आयातीच्या पोटीं यंत्र-सामुग्री वगैरे लवकर न मिळाल्यामुळें बराच खच्ची होईल आणि जें उत्पादन वाढविण्याकरतां हिंदुस्थानची एकसारखी धडपड चालूं आहे ती निष्फळ ठरून देशांतडे दुर्भिक्ष्य चालूंच राहील.

आणखी एक भानगड या फेडीच्या बाबतींत निर्माण होण्यासारखी आहे. यापुढें जर हिंदुस्थान निरनिराळ्या स्वायत्त घटकांत विभागला गेला तर या शिलकांवर आज जी हिंदुस्थानची एकमेव सत्ता आहे ती तशी राहणार नाहीं. कोठलाही घटक त्यावर हक्क सांगूं शकेल आणि ब्रिटनला लवकर फेड न करण्याला आणखी एक कुलंगडें उपस्थित करावयास सांपडेल.

## हिंदुस्थानांतील म्हशींच्या नामांकित जाती

हिंदुस्थानांत म्हशींच्या ज्या नामांकित जाती आहेत त्यांत मुरा अगर दिल्ली, पंजाबमधील निली व रावी, काठेवाडांतील जाफराबादी, सुरती अगर नडीयाद म्हैस, व एलिचपुरी अगर नागपुरी ह्या महत्त्वाच्या जाती होत.

**दिल्ली म्हैस** प्रथमश्रेणीची असून ती दक्षिण पंजाबांत रोहटक, कर्नाळ अगर दिल्ली विभागांत मुख्यत: सांपडते. ह्यांचीं शिंगें एडक्यांच्या. शिंगासारखीं वळलेलीं व जाड असतात. रंग काळा अगर भुरा असतो. ह्यांचें वजन १००० ते १२०० पौंड असतें. टोणगा १५०० पौंड वजनाचा असतो. दिल्ली म्हशींत कांहीं जनावरें १०,००० पौंड एका वेतांत दूध देणारीं आढळतात. मध्यवर्ती संशोधनसंस्थेंत ह्या म्हशींचें सरासरी वेताचें दूध ४५०० पौंड मिळत असल्याची नोंद आहे. एका वेतांत ३०० दिवस दूध निघूं शकतें.

**निली जातीची म्हैस** मुलतान, मांटगामेरी व फेरोझपूर जिल्ह्यांत आढळते. ह्यांचा रंग काळा असून कपाळ, तोंड व पाय पांढरे व म्हशीचें वजन ९०० ते १००० पौंड असतें. बहादूरनगर येथील पंजाब सरकारचे गोठ्यांतील कळपाचे सरासरी एका वेताचें दूध ३५०० पौंड असून तें २५० दिवसांत मिळतें.

**रावी म्हैस** ही लियालपूर जिल्ह्यांत रावी नदीचे कांठीं आढळते. रंग काळा अगर भुरा असून शिंगें रुंद, जाड व लांब असून शेवटीं वळलेलीं असतात. ह्या म्हशी २५० दिवसांत ४००० पौंड दूध देतात.

**जाफराबादी म्हैस** ही गीर जंगलांत आढळते. त्यांचें डोकें पुढें आलेलें असून शिंगें जाड, रुंद व पुष्कळच लांब असून खालीं जाऊन टोंकाजवळ वळलेलीं असतात. चांगल्या म्हशी रोजीं २७ ते ३५ पौंड दूध देतात.

**सुरती म्हैस**—ही गुजराथमध्यें नडियाद, आनंद व खेडा जिल्ह्यांतील बलसड येथें आढळतात. पुणें शेतकी कॉलेजांतही ह्याच जातीचा कळप असून तेथें त्या रोज २० ते २५ पौंड दूध देतात.

**नागपुरी म्हैस**—ह्या जातीच्या म्हशी मध्यप्रांतांत व दक्षिण हिंदुस्थानांतही आढळतात. ह्यांचीं शिंगें पुष्कळच लांब व चपटीं असतात. टोणगे मशागतीला व ओझें वहाण्याचे उपयोगी पडतात. ह्या जातीच्या चांगल्या म्हशी १५ ते १८ पौंड दूध देऊं शकतात.

---

### कंपनी कायद्याच्या दुरुस्तीचें बिल खासगी ( डॉ. देशमुखांचें ) आहे.


सा. न. वि. वि.

पृ. १७१ वर 'कंपनीकायद्यांत सुधारणा' या मोठ्या मथळ्याखालीं 'हिंदुस्थान सरकारनें तयार केलेलें बिल' असा छोटा मथळा आहे. सदर बिल खाजगी असून तें मुंबई शहरातर्फेचे सुप्रसिद्ध खासदार डॉ. जी. व्ही. देशमुख यांनीं तयार केलें व लेजिस्लेटिव्ह असेंब्लीनें तें दाखल करून घेतलें व लोकमत अजमावण्यासाठीं तें सरकारमार्फत केवळ प्रसिद्ध झालें आहे.

द. ग. येरवडेकर

पुणें एम. ए., एलएल. बी

*वरील चूक निदर्शनास आणल्याबद्दल श्री. येरवडेकर ह्यांचे आभारी आहों. संपादक.


असल्या संस्थांचें कार्य थोर आहे; पण आपल्यापैकीं कोणासहि त्यांत जाण्याची पाळी येऊं नये असें वाटतें.

**यावर विमा उतरणें हा एकच उपाय**

—: प्रमुख सल्लागार :—

**श्री. वा. ग. चिरमुले, बी. ए., एलएल. बी., प्रेसिडेंट**

कौन्सिल ऑफ डायरेक्टर्स, वेस्टर्न इंडिया लाइफ इन्शुअरन्स कंपनी लिमिटेड... सातारा.

—: चेअरमन :—

**श्री. डी. डी. देशपांडे, बी. ए., मॅनेजिंग डायरेक्टर**

न्यू सिटिझन बँक ऑफ इंडिया लिमिटेड... मुंबई.

*** पहिल्याच मूल्यमापनांत नफा झाला आहे.**

*** डॉक्टरी तपासणीशिवाय रु. ९०० चा विमा घेता येतो.**

**★ लायसेन्सशिवाय एजन्सी घेतां येते.**

—ठिकठिकाणीं ऑर्गनाइझर्स व एजंट्स नेमणें आहेत.—

आधिक माहितीसाठीं भेटा अगर लिहा.

**श्री. शि. न. कोल्हटकर,**

बी. ए.,

मॅनेजिंग डायरेक्टर.

**युवर ओन प्रॉव्हिडंट इन्शु. कं., लि.**

वेस्टर्न इंडिया हाऊस, सर फेरोजशहा मेहता रोड, फोर्ट, मुंबई.

## नव्या भांडवल उभारणीस परवानगी

| कंपनी | धंदा | मान्यता दिलेलें भांडवल ( रु. ) | शेरा |
|---|---|---|---|
| रूपनगर इंडस्ट्रीज कलकत्ता | वनस्पतींचें तेल रंग इत्यादि | ५०,००,००० | नवी कंपनी |
| मदर इंडिआ फायर अँड जनरल इन्शु. कं. लि. मदुरा | विमा | ५,००,००० | जु. कं. चें नवीन भांडवल. |
| इंडिअन नॅशनल मूव्हीटोन लि. संयुक्तप्रांत | बोलपट | २०,००,००० | नवी कंपनी. |
| रॉयल स्टुडिओज लि. मदुरा | बोलपट | १५,००,००० | नवी कंपनी |
| मरीन प्रॉडक्टस लि. मुंबई | मिठाचा कारखाना | १०,००,००० | नवी कंपनी |
| मोटर अँड जनरल इन्शुरन्स कं. लि. कलकत्ता | मोटर–विमा | १०,००,००० | नवी कंपनी |
| टेलिफोन मॅन्युफॅक्चरर्स ऑफ इंडिआ लि. संयुक्तप्रांत | टेलिफोनची सामुग्री | ८,००,००० | जु. कं. चें नवीन भांडवल |
| अजमीर मॉर्टगेज लि. अजमीर | बँक | ७९,०४० | जु. कं. चें नवीन भांडवल |
| मर्कंटाइल बँक ऑफ हैद्राबाद लि. द. हैद्राबाद | बँक | १,००,००,००० | नवी कंपनी |
| सेंट्रल एशिआ इन्शुरन्स कं. लि. ओरिसा | आयु-विमा आग विमा वगैरे | २०,००,००० | नवी कंपनी |
| नगरकर्स बँक लि. मंगलोर | बँक | २,००,००० | जु. कं. चें नवीन भांडवल |
| मायर मिल्स लि. मुंबई | कापड व सुताची गिरणी | १०,००,००० | जु. कं. चें नवीन भांडवल |

**अमेरिकेंतील हिंदी विद्यार्थी**—अमेरिकेंत एकूण १५,३५० विदेशी विद्यार्थी आहेत. त्यांत ७६६ हिंदुस्थानांतील आहेत. १,४९८ चिनी विद्यार्थी अमेरिकेंत शिकत आहेत.

**सिंधसाठीं यांत्रिक नांगर** — सिंध प्रांतांतील शेतमजुरांची दुर्मिळता लक्षांत घेऊन सिंध सरकारनें ३० यांत्रिक नांगर अमेरिकन कंपन्यांकडून घेण्याचें ठरविलें आहे असें समजतें. हे नांगर धरणाखालीं भिजूं शकणाऱ्या जमिनींतच मुख्यतः वापरण्यांत येणार आहेत.

**समुद्रांत खोल जाण्याचा विक्रम**—डॉ. ऑगस्ट पिकार्ड नांवाचे स्विस शास्त्रज्ञ समुद्रांत अधिकांत अधिक खोल बुडी मारण्याचा प्रयत्न करणार आहेत. त्यासाठी ते पाणबुडे वापरतात त्याच्या सारखी दहा टन वजनाची अजस्र घंटा वापरणार आहेत. समुद्रांत ३ मैल खोल जाणेचा त्यांचा विचार आहे.

**तीन मैल खोल तेलाची विहीर**—रशिआंतील बाकु शहराजवळ लवकरच एक तीन मैल खोल तेलाची विहीर खणण्यांत यावयाची आहे. ही विहीर रशियांतील सर्वांत अधिक खोल होणार असून त्यासाठी मुद्दाम बनविलेली नवीन यंत्रसामुग्री वापरण्यांत येणार आहे.

**आंतरराष्ट्रीय धान्य-समिति**—आंतरराष्ट्रीय अन्नसमितीनें १९४७ साली निरनिराळ्या राष्ट्रांना मिळून २१ लक्ष, ५८ हजार, ७०० टन इतका तांदूळ मंजूर केला आहे. या तांदुळाच्या वाटपांत हिंदुस्थानच्या वांट्याला ४ लाख, ८५ हजार टन तांदूळ आला आहे.

**ऑस्ट्रेलिआची घटती लोकसंख्या**—ऑस्ट्रेलिआंतील लोकसंख्या सध्या वाढत आहे ती इतक्या अल्प प्रमाणांतच वाढत राहिली तर सुमारें ५५ वर्षांत ऑस्ट्रेलिअन म्हणून शिल्लकच रहाणार नाहीं, अशी भीति ऑस्ट्रेलिआच्या माहिती-मंत्र्यांनीं व्यक्त केली आहे. जननाचें प्रमाण आहे असेंच चालू राहिलें तर १९७५ सालीं १५ वर्षांखालील मुलांचें प्रमाण शेकडा २० ते २२ राहील असा अंदाज त्यांनीं व्यक्त केला.

**आस्ट्रेलिआचें गव्हाचें आश्वासन**—ऑस्ट्रेलिअन सरकारनें हिंदुस्थानला ८ हजार टन गहूं तातडीनें धाडण्याचें ठरविलें आहे असें समजतें. येत्या ऑगस्टमध्यें ऑस्ट्रेलिअन गव्हाचा सांठा कितपत आहे तें पाहून आणखीही गहूं पाठविण्याचा त्यावेळीं विचार करण्यांत येईल असें समजतें.

दि
प्रेसिडेन्सी इंडस्ट्रियल
बँक
लि.
प्रेसिडेन्सी बँक बिल्डिंग
पुणें २.

अधिकृत, विक्रीस काढलेलें
व खपलेले भांडवल रु. १०,००,०००
जमा झालेलें भांडवल रु. ७,०५,५९५
खेळतें भांडवल रु. ६१,००,०००

मुंबई शाखाः—इस्माईल बिल्डिंग, हॉर्नबी रोड मुंबई १
श्री. ग. रा. साठे, अध्यक्ष. श्री. दा. ग. बापट, उपाध्यक्ष.
बँकिंगचे सर्व व्यवहार केले जातात.
"बँक शिड्यूल्ड बँक झाली आहे."
श्री. गो. धों. जोगळेकर बी. ए. (ऑ.), बी. कॉम., एलएल. बी., मॅनेजर
श्री. सी. टी. चितळे मॅनेजिंग डायरेक्टर

## मुंबई शेअर बाजार

व्याज-वजा

( वि. म. लिमये आणि मं. यांजकडून )

साप्ताहिक बंद भाव

स्वदेशी रु. २७ दि. २८।५।४७

| १९४६ मधील चढउतार | दिलेलें व्याज † संडित S अंतिम | व्याज केव्हां मिळतें | कंपनीचें नांव | मूळ रु. | मंगळवार २०।५।४७ | बुधवार २१।५।४७ | गुरुवार २२।५।४७ | शुक्रवार २३।५।४७ | सोमवार २६।५।४७ |
|---|---|---|---|---|---|---|---|---|---|
| १९१७८; १५२७-८ | †२९-८-९ | ऑगस्ट | टाटा डिफर्ड | ३० | १९२५ | १८७२-८ | १८६० | १८६५ | १८४२-८ |
| ६३८; ४५७-८ | २३-०-० | ऑगस्ट | टाटा आर्डिनरी | ७५ | ३७६—८ | ३७० | ३७१-० | ३७१-८ | ३६—९ |
| ६५; ३६-४ | ०-८-८S | ऑगस्ट | बेंगाल स्टील | १० | २४ | २२-११ | २३ | २३ | २२—७ |
| ७१; ४४-१० | ०-१४-०S | डिसेंबर | इंडियन आयर्न | १० | ३०—११ | २८-१३ | २८-१२ | २९ | २७-१४ |
| | 'बोनस शेअर' | | | | | | | | |
| ३२७७-८; २१३२-८ | ४०-०-०S | मार्च-सप्टें. | बॉम्बे डाईंग | २५० | ९९७—८ | ९५५ | ९६० | ९८० | ९७६-४ |
| ११८०; ६५८ | १३-०-०S | मार्च-सप्टें. | कोहिनूर | १०० | ६४४ | ६१५ | ६१० | ६१९ | ६२५ |
| ९९९; ६६० | २७-०-० | मे | स्वदेशी | १०० | ६०६ | ५८५ | ५८० | ५९७ | ६०६ |
| ५६७; ३९८ | २-०-०† | नोव्हें.-एप्रिल | नागपुर | १०० | २७८ | २७५ | २७३ | २७६ | २७४ |
| ५१२; ३१४ | १५-०-० | मार्च | फिनले | १०० | २९४ | २९० | २८६ | २८८ | २९२ |
| ५७१; ३२३ | १२-०-०S | ऑक्टो.-एप्रिल | गोकाक | १०० | २९१ | २८७ | २८६ | २८९ | २९० |
| ५९४; ३२५-८ | ४-०-०† | जाने.-जुलै | सिंप्लेक्स | ५० | ३१२—८ | ३०० | ३०० | ३१६ | ३२९ |
| ७-४-६; ४-८-६ | ०-४-० | मार्च | अपोलो | २ | ३-१३-६ | ३—१३ | ३—१२ | ३-९ | ३-१०-६ |
| २९-१; १६-१२ | ०-१३-९ | मे | इंडि. यु. ऑर्डि. | १० | १८—१५ | १४-१४ | १४-१३ | १४-१५ | १५ |
| ६-११-६; ३-३-६ | ०-२-६ | मे | ,, डिफर्डस् | १ | २—१३ | २—१२ | २-११-६ | २-११-६ | २—१२ |
| १०९२-८; ७३५ | ४१-०-० | ऑगस्ट | इंदूर माळवा | १०० | ५१२—८ | ५१२-८ | ५१२-८ | ५१५ | ५११-४ |
| २७८; २२५ | ७-०-० | जानेवारी | असो. सीमेंट | १०० | १७४ | १७२-८ | १७० | १७१-८ | १७० |
| ३७५; २४० | ९-०-० | जानेवारी | बेलापूर शुगर | ५० | २५० | २४५ | २४३ | २४७ | २४५ |
| ९१०; ६०५ | १०-०-० | डिसेंबर | बॉम्बे बर्मा | १२५ | ४४० | ४२८—१२ | ४२५ | ४२५ | ४२२-८ |
| ६०-१० ३६-१२ | १-४-० | नोव्हेंबर | शिंदिया स्टीम | १५ | ३०-३ | २९—३ | २८-१५ | २९—२ | २८-१२ |

**पूना इलेक्ट्रिक सप्लाय कं. लि.**—ह्या कंपनी मार्फत रस्त्यांवरलि ५,९०९ दिव्यांस वीज पुरविली जाते. १९४६ मध्यें १३० नवे दिवे बसविण्यांत आले. खडकी येथील फॅक्टरीमधील व युद्धविषयक इतर कारखान्यांतील विजेचा खप कमी झाला आहे, परंतु घरगुती व व्यापारी वापर वाढला आहे त्यामुळें कमी यूनिट वीज खपूनहि कंपनीचें उत्पन्न जास्त झालें आहे. १९४६ सालीं नव्या ९५५ ग्राहकांस वीज देण्यांत आली. खालील तक्त्यांत कंपनीच्या प्रगतीचे आकडे दिले आहेत:—

| वर्ष. | ग्राहकांची संख्या. | कमाल येऊं शकणारी मागणी. (किलोवॅट) | खपलेली वीज. (लक्ष यूनिट) | विजेच्या खरूपाचें उत्पन्न (लक्ष रु.) |
|---|---|---|---|---|
| १९४४ | १६,४६० | १५,८४१ | २७९ | २१ |
| १९४५ | १६,८०० | १६,४८८ | २७२ | २३ |
| १९४६ | १७,७७५ | १७,२८२ | २६१ | २३½ |

## महाराष्ट्र सहकारी विद्यालय, पुणें.

या विद्यालयाचे वर्ग ता. ७ जून १९४७ पासून नं. ५, जयरामजी जिजीभाई रोड, पुणें नं. १ या ठिकाणीं सुरू होणार आहेत. अभ्यासक्रम सहा महिन्यांचा असून त्यापैकीं पहिल्या चार महिन्यांत सहकाराचा शास्त्रीय अभ्यास झाल्यावर विद्यार्थ्यांस सहकारी संस्थांमध्यें प्रत्यक्ष कामाचा अनुभव परीक्षेपूर्वी दोन महिने देण्यांत येणार आहे. कमींत कमी मॅट्रिक पास झालेल्यांना प्रवेश मिळेल. तसेंच सहकारी खात्यांतील किंवा सहकारी संस्थांतील वरील शिक्षण घेऊं इच्छिणाऱ्या विद्यार्थ्यांनींहि अर्ज करावे. फक्त ५० विद्यार्थी घेणें आहेत. अभ्यासक्रमाचें माहितीपत्रकासाठीं व प्रवेश-अर्जाच्या प्रतीसाठीं लिहावें किंवा भेटावें. भेटण्याची वेळ दुपारीं २ ते ४.

बा. वि. कुंभारे
सुपरिंटेंडेंट

ता. २३ मे १९४७.







**साठे बिस्किटें**

ठराविक पुरवठा नियमितपणें दरमहा होत आहे.

आतां माल सांचवून ठेऊं नका.

प्रचलित सरकारी नियंत्रणामुळें बिस्किटांकरतां लागणारा योग्य तो कच्चा माल मिळणें अशक्य झालें आहे.तथापि त्यांतल्या त्यांत चांगला माल मिळेल तोच वापरण्याचा आमचा सतत प्रयत्न असतोच. तरी व्यापाऱ्यांनीं बिस्किटें जास्त दिवस सांचवून न ठेवतां शक्यतितका ताजा माल ग्राहकांस देण्याची खबरदारी घेणें अधिक चांगलें!

साठे बिस्किट कंपनी, पुणें २.

## वजावटींतील चुकीमुळें कबजा गेला !


### रेंट ॲक्टबाबत मुंबई हायकोर्टाचा निवाडा


मुंबई हायकोर्टाचे एक न्यायमूर्ति, श्री. दीक्षित यांनीं नुकताच एक महत्त्वाचा निकाल दिला आहे. अहमदाबाद येथील श्रीकर्ण-मुक्तेश्वर महादेव देवालयाच्या मालकीची कांहीं मोकळी वखळ-जागा वार्षिक ६५१ रुपये भाड्यानें सात वर्षांच्या भाडेपट्ट्यानें श्री. नारायणदास मंगलदास पटेल यांचेकडे जुलै १९३४ पासून होती. तिचा उपयोग लाकडाची वखार म्हणून करण्यांत येत होता. भाडेपट्टा वरील श्री. पटेल व देवालयाचे त्यावेळचे व्यवस्थापक यांचे दोघांत झालेला होता. मुदत संपल्यावर पुनः नवा भाडेपट्टा करण्याबाबत बोलणीं झालीं होतीं; परंतु त्यांत यश आलेलें नव्हतें. भाडेकरी श्री. पटेल यांनीं देवालयाच्या व्यवस्थापकांपैकीं एकाचे मुलाविरुद्ध एक हुकुमनामा मिळविला होता. त्या हुकुमनाम्या-पोटीं येणें असलेली रक्कम ८६८ रु. जागेच्या भाड्यामधून काढून घेण्याच्या उद्देशानें भाडेकरी श्री. पटेल यांनीं त्या रकमेची वजा-वट जागेच्या भाड्यामधून केली. त्यामुळें देवालयाच्या तत्कालीन व्यवस्थापकास सदर श्री. पटेल यांचेविरुद्ध जागेचा कबजा मागण्या-चा दावा करावा लागला. त्याचा निकाल श्री. पटेल यांचेविरुद्ध लागून डिस्ट्रिक्ट कोर्टाकडील अपिलांत तोच निकाल कायम करण्यांत आला. त्यावर भाडेकरी श्री. पटेल यांनीं हायकोर्टाकडे अपील केलें. त्यांत हायकोर्टानें निकाल दिला कीं अशा प्रकारची वजावट (सेट-ऑफ ) करतां येणार नाहीं. ती वजावटीच्या तत्त्वाविरुद्ध आहे. श्री. पटेल यांनीं अशी जी वजावट केली आहे तीमुळें त्यांनीं भाडे-करूंच्या प्रचलित कायद्याअन्वयें मिळणारें संरक्षण गमाविलें आहे. वजावट करावयाची तेथें वादीच्या व प्रतिवादीच्या दोन्ही व्यव-हारांतील भूमिका समान पाहिजे व वादी-प्रतिवादीहि पूर्वीचेच असले पाहिजेत. या ठिकाणीं व्यवस्थापकाच्या मुलाकडून यावयाची रक्कम त्या मुलाच्या बापाला देवालयाचा व्यवस्थापक म्हणून द्यावयाच्या रकमेंतून वजा घातली आहे. मुलगा निराळा आणि मुलाचा बाप निराळा व शिवाय देवालयाचा व्यवस्थापक या भूमिकेवरील बाप-तर त्याहूनहि निराळा. अशा स्थितींत श्री. पटेल यांनीं केलेली वजा-वट चुकीची ठरते व भाडेनियंत्रण कायद्याप्रमाणें भाडेकरी या नात्यानें ठरलेलें भाडें द्यावयाची जी तयारी दाखवावी लागते ती श्री. पटेल यांनीं दाखविली नाहीं असें सिद्ध होतें; म्हणून हायकोर्टानें कबजा मागणीचा दावा कायदेशीर ठरवून श्री. पटेल यांनीं देवा-लयाची वखळ जागा व्यवस्थापकांच्या ताब्यांत द्यावी असा हुकूम दिला.


### कोळशाच्या धंद्याबाबत नवें धोरण

हिंदुस्थान सरकारनें औद्योगिक–कलह–कायद्यान्वयें कोळ-शाच्या खाणीचा धंदा सार्वजनिक उपयुक्ततेचा ठरविला आहे. हा निर्णय ता. ३ मे १९४७ पासून सहा महिनेपर्यंत अमलांत रहाणार आहे. १९४७ सालीं मंजूर झालेल्या या कायद्यान्वयें, कायद्यांत समाविष्ट केलेल्या परिशिष्टांतील कोठलाही धंदा सार्व-जनिक उपयोगाचा असल्याबद्दल योग्य त्या सरकारला द्वाही फिरवितां येईल. अर्थात्, तसें करणें इष्ट आहे याबद्दल त्या त्या सरकारचें समाधान आधी झालें असलें पाहिजे. कोळशाच्या खाणीच्या धंद्याबद्दल सरकारनें स्वीकारलेल्या या नव्या धोर-णाचा अर्थ असा होतो कीं कोळशाच्या खाणींत संप अगर टाळे-बंदी आतां करता येणार नाहीं. त्याचप्रमाणें या धंद्यांत एखादा कलह उत्पन्न झाला असला, अगर होईल असें वाटत असलें तर तो तडजोडीनें मिटविण्याची व्यवस्था सक्तीनें करावी लागेल. कोळ-शाच्या उत्पादनांत झालेली घट या धोरणानें नाहींशी झाली तर तें यशस्वी झालें असें म्हणतां येईल.




हे पत्र पुणें, पेठ भांबुर्डा घ. नं. ९१५।१ आर्यभूषण छापखान्यांत रा. विठ्ठल हरि बर्वे यांनीं छापिलें व रा. रा. श्रीपाद वामन काळे, बी. ए. यांनीं 'दुर्गाविलास,' ८२३ शिवाजीनगर, (पो. ऑ. डेक्कन जिमखाना) पुणें ४ येथें प्रसिद्ध केलें.